# तीन त्रिक दहा

उत्पल व. बा.

**तीन त्रिक दहा (ललित लेख संग्रह)**

Teen trik daha- lalit lekh sangrah

**© उत्पल व. बा.**

**प्रकाशक**

साहित्यसंस्कृती,

४६२६ किंग्ज लँडिंग लेन

केटी, टेक्सास, अमेरिका- ७७४९४

**ISBN**: 978-1-939830-10-4

**मुखपृष्ठ**

रमाकांत धनोकर

**संपादन-**

सोनाली जोशी

मुद्रितशोधन- उत्पल व. बा.

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any physical or electronic form or by any other means, without the prior written permission from the Publisher and the Author.

जगण्यातील सर्व प्रकारच्या गोंधळास

# सनी लिओन आणि संस्कृती

'झेड' नावाने ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातील एका लांबलचक आणि 'झेड'सारखाच आकार असलेल्या पुलावरून मी आणि मन्या बोडस मॉर्निंग शो टाकून परत येत होतो. हा पूल सरळ न बांधता 'झेड'सारखा का बांधला असेल हा नेहमी पडणारा प्रश्न आत्ताही मनात एंटर होतोय न होतोय तोच बोडसाने एकदम बाईक थांबवली आणि तो बाजूला असलेलं होर्डिंग निरखून बघू लागला. काय आहे म्हणून मीही वर बघू लागलो. तर ते एका मंडळाचं 'दहीहंडी'चं होर्डिंग होतं. 'दहीहंडी' म्हणजे पुढच्या दोन महिन्यात पुण्यात उठणाऱ्या सांस्कृतिक कल्लोळाची नांदीच! मी याची नोंद घेतली आणि मन घट्ट करून होर्डिंग बघू लागलो. मंडळाचे पदाधिकारी, दोन मराठी नट्या ('आकर्षण' या शीर्षकाखाली), आणि 'खास आकर्षण'खाली सनी लिओन! बोडसाची बाईक का थांबली ते माझ्या लक्षात आलं. आता हा ज्वलंत मुद्दा बोडस चर्चेला घेणार हे मला दिसत होतं म्हणून मी लगेचच 'उशीर होतोय' असा मेसेज हिला करून टाकला.

माझ्या अंदाजाप्रमाणे गाडी चहापानासाठी थांबलीच. बोडसाने सिगरेटही शिलगावली. 'सिगरेट पिणं इज कूल' असा शोध त्याला अलीकडेच लागला होता. दोन बोटात सिगरेट धरून अंगठ्याने कपाळ घासत तो वदला, "च्यायला सनी लिओन?"

"अरे ते नुसतं छापतात. गर्दी खेचायला. ती येईलच असं नाही." मी म्हटलं.

"गर्दी 'खेचायला'? अरे सांस्कृतिक उत्सव म्हणवता ना तुम्ही? 'संस्कृतीत' हे चालतं का?" बोडस.

"मग मराठी किंवा हिंदी नटी येणं तरी कसं चालतं?" मी.

"अरे चित्रपटात अभिनय करणं ही काहीएक कला आहे. आणि हे लोक इतर वेळी पोर्नोग्राफीच्या नावाने ओरडतात त्याचं काय?" बोडस. "बरं मग सई ताम्हणकरला बोलावलं तर चालेल का?" मी खोचकपणे मुद्दामच हा प्रश्न विचारला, कारण सई ताम्हणकरचा बिकिनी अवतार बातम्यात (आणि खोटं कशाला बोला - स्मृतीतही) ताजा होता."तुझ्या लक्षात येत नाहीये. मुंबईतल्या दहीहंडीला ज्या नट्या जातात त्यांनी बिकिनी घातली असेलच की. इट इज अ पार्ट ऑफ द जॉब!" बोडस.

"यू मीन पार्ट ऑफ द ॲक्टिंग जॉब?" मी.

"हो. दुर्दैवाने हो. पण पोर्नोग्राफीचं काय? संस्कृतीरक्षक तर त्याच्या विरोधात आहेत. त्यांच्या संस्कृतीत ते बसत नाही ना..." बोडस.

"मित्रा, बिकिनी घालणं हेदेखील संस्कृतीत बसत नव्हतंच. बिकिनी जशी 'बसली' तशीच आता पोर्नोग्राफीही बसेल" मी म्हणालो.

"म्हणजे तुला हे मान्य आहे तर. पोर्नोग्राफीही मान्य आहे?" बोडस.

"मन्या, मी पोर्नोग्राफी मान्य किंवा अमान्य करून काय फरक पडणार आहे रे? मला दहशतवाद मान्य नाही, भ्रष्टाचार मान्य नाही, मराठीची अवनती मान्य नाही, हुंडा मान्य नाही - पण मला कुणी विचारतंय का? दहशतवाद अल कायदा अमान्य करेल तो सुदिन!" मी.

"प्रश्न टाळू नकोस. तुला तत्त्वतः पोर्नोग्राफी मान्य आहे की नाही?" मन्या.

"मन्या, मला वाटतं आपण कॉलेजातले दिवस आठवावे आणि या प्रश्नाचं उत्तर द्यावं." मी म्हटलं.

मन्या गंभीर झाला. मीही झालो. 'तो' चित्रपट पहिल्यांदा पाहिला तो प्रसंग, नंतरही पाहिले ते प्रसंग. आता 'ते' चित्रपट पाहिलेल्यांनी 'त्या'च्याबद्दल आक्षेप घेतला तर ते योग्य होईल का? "मन्या, ख्रिस्ताच्या चालीवर मला असं म्हणावसं वाटतंय की ज्यांनी कधीच ब्ल्यू फिल्म बघितली नाही त्यांनीच फक्त सनी लिओनला हरकत घ्यावी!.." मी. ज्याला आपण पराभूत हास्य म्हणतो तसं हसत बोडस म्हणाला, " हो. पोर्नोग्राफी आपण मान्य केलेली आहेच..."बोडस निराश झाल्याचं मला बघवत नाही. मी त्याचा 'ॲडव्होकेट' होत म्हणालो, "मन्या, तुझा पहिला मुद्दा बरोबर आहे पण. ज्यांच्या दृष्टीने लैंगिक संबंधांचं खुलं दर्शन घडवणं संस्कृतीत बसत नाही अशांना पोर्नस्टारला आमंत्रण देणं हे कसं चालतं? म्हणजे आता ज्यांनी तिला आमंत्रण दिलं त्यांनी त्यांच्या मुलांना ब्ल्यू फिल्म बघितली म्हणून रागावता कामा नये किंवा त्यांची मुलगी म्हणाली की मी मॉडेलिंग करते किंवा बिकिनी घालते तर त्यांना संस्कृती आठवता कामा नये. काय?"

"ते ठीक आहे. पण ते तात्विक पातळीवरून. आपल्याकडचा ढोंगीपणा तुला माहीतच आहे. त्यामुळे सनी लिओनला बोलावणारे आणि तिला बघायला गर्दी करणारे आपल्या बायकोच्या किंवा मुलीच्या बाबतीत 'संस्कृतीनिष्ठ' असतात हे मी वेगळं सांगायला नको. ते सोड. मला सांग, तुला सनी लिओनचा फोटो बघून धक्का नाही बसला?""अं...थोडासा बसला. आणि तो सांस्कृतिक धक्का होता हेही मी मान्य करेन. पण मला काही हा प्रकार अगदी भयंकर वगैरे आहे असं नाही वाटलं." मी म्हणालो.

"का?"

" एक तर दहीहंडी हा सांस्कृतिक उत्सव आहे असं ते साजरा करणारे म्हणोत, मला आणि मला वाटतं तुलाही, असं अजिबात वाटत नाही. बरोबर?"

"उत्सव सांस्कृतिक नाही असं अगदी ठामपणे नाही म्हणणार मी. संस्कृतीतील प्रतीके, सण-उत्सव वैयक्तिक पातळीवर अमान्य असू शकतात, पण त्यांचं स्थान नाकारूनच टाकावं असंही मला वाटत नाही. मात्र एक गोष्ट शंभर टक्के खरी की दहीहंडी, गणपती, नवरात्र याचं 'आजचं रूप' वाईट आहे." मन्या.

"ओके. तर एकूणात आजचा दहीहंडी उत्सव हा खऱ्या अर्थाने 'सांस्कृतिक' नव्हे हे मान्य आहे तर." मी विचारलं.

"हो." मन्या.

"मग त्यात सनी लिओन आली काय किंवा अजून कुणी आली काय? काय फरक पडतो?" मी.

"मग सनी लिओन उद्या गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीत आली तर?" मन्या.

"हो. चालेल की. गणपतीसमोर जर दारू पिऊन सलमान खानच्या गाण्यावर नाचलेलं चालतं, तर सनी लिओनने काय घोडं मारलंय?"

माझा आवाज बहुधा जरा वरच्या पट्टीत गेला असावा. कारण आजूबाजूची माणसं आमच्याकडे बघायला लागली. हॉटेलमध्ये तुरळकच माणसं होती. त्यातला एक लॅपटॉपला बिलगला होता, दोन कामगार टी ब्रेकसाठी आले होते आणि एक बऱ्यापैकी 'विमनस्क' दिसणारा माणूस हातात मोबाईल खेळवत होता. दाढीचे अस्ताव्यस्त वाढलेले खुंट आणि चेहऱ्यावरचे 'लॉस्ट' भाव. अचानक उठून तो आमच्या टेबलाजवळ आला आणि म्हणाला, "माफ करा, पण तुमचं बोलणं

मी ऐकत होतो. तुमचे मुद्दे पटतायत, पण सांस्कृतिक धक्का सनी लिओनच देते असं काही नाही. आंतरजातीय विवाहासारखे 'चांगले सांस्कृतिक धक्के' असतातच की. मुद्दा धक्क्याचा नाही. योग्य आणि अयोग्य याचा आहे."

एवढंच बोलून तो निघत होता पण बोडस लगेच म्हणाला, "पण मग योग्य-अयोग्य हाच जर मुद्दा असेल तर संस्कृतीचं काय?"

"संस्कृती म्हणजे योग्य-अयोग्यची एकच एक यादी कुठे असते? संस्कृती, एकाच देशाचीसुद्धा, एकसंधच असते असं तरी कुठे आहे? ती विभागलेलीच असते. मातृत्वाची महती ही आपली संस्कृती आहे की सोशल कंस्ट्रक्ट?"

"या न्यायाने तर सगळंच सोशल कंस्ट्रक्ट म्हणावं लागेल!" मन्या.

"देअर यू आर! मला हेच म्हणायचं आहे. संस्कृती असं आपण म्हणतो खरं पण मुळात संस्कृती म्हणजे कायम हातात ओवाळणीचं ताट घेतलेली गुणी, सोज्वळ स्त्री असते का? नाही. ती वांडपणाही करते. मुळात संस्कृती म्हटली की सोज्वळ स्त्री आठवणं हे सोशल कंस्ट्रक्टच आहे ना? म्हणून तर पोर्नस्टार म्हटलं की आपण भिवया उंचावतो. पण उद्या सनी लिओनने उत्तम अभिनेत्री म्हणून स्वतःला सिद्ध केलं तर? अर्थात ती शक्यता कमी आहे. पण तरी एक शक्यता म्हणून म्हणतोय मी.." तो किंचित हसत म्हणाला."तुम्ही बसा की. वेळ आहे ना?" बोडस त्याला जागा देत म्हणाला.

विमनस्क माणूस बसला. चहाची रिपीट ऑर्डर गेली.

"तसं झालं तर चांगलीच गोष्ट म्हणायची." मन्या. "राईट. मला वाटतं कुणी पोर्नस्टार आहे यापेक्षाही कुणी पोर्नस्टार का आहे हा जास्त इंटरेस्टिंग मुद्दा आहे. तिथे संस्कृतीचा संबंध आहे असं मला नाही वाटत. किंवा असलाच तर संस्कृतीच्याच 'मागण्यां'चा आहे. भरपूर पैसे कमावणं, पुढे असणं ही आजची मूल्यं आहेत. जशी मूल्यं, तशी संस्कृती. आपण उगाच जशा मुली, तशी संस्कृती असा घोळ करतो. आता दहीहंडीमागचं मूल्य काय आहे? तर पैसे मिळतील म्हणून हंडी फोडणं. आणि याच मूल्यावर आधारलेली संस्कृती आपण इतरत्रही बघतोच की. बिपाशा बसु किंवा करीना कपूर यांनी बिकिनी घालणं आणि खूप पैसे मिळवणं हा 'क्लास' का आहे? आणि तेच जर वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रीने केलं तर त्याला 'क्लास' आहे का? ती जर सिनेमात गेली आणि तिने खूप पैसे मिळवले तर तो क्लास होईल. तोपर्यंत नाही. सनी लिओनने एक सिनेमा केला म्हणून ती 'क्लास'मध्ये आली. ती जेव्हा हार्डकोअर पोर्नस्टार होती तेव्हा तिला क्लास नव्हता, किमान आपल्याकडे तरी. तेव्हा मूल्य तपासणं गरजेचं, संस्कृती कॅन वेट. संस्कृतीत अभिमान वगैरे भानगडी येतात. मूल्यामध्ये 'मोठा' विचार असतो. पटतंय का?" तो. मी आणि मन्या, आम्ही दोघेही जरा गारद झालो होतो. काही वेळ शांततेत गेला.

मग बोडस म्हणाला, "तात्विक पातळीवर हे ठीक आहे. पण अखेरीस 'बिग पिक्चर' तर बघायला हवं ना?""हं...बिग पिक्चर! खरं आहे...बिग पिक्चर गोची करतं हे खरं आहे...पण संस्कृती, अभिमान यापेक्षा 'मूल्यविचार' रुजावा हे तर मान्य?" त्याने विचारलं. "हो. मान्य."मन्या."पण तिथेही मूल्य म्हणजे काय? कोणती? हे प्रश्न येतीलच की." मी म्हटलं.

"हो. अर्थात येतील. पण आपण किमान रस्ता तरी योग्य धरू. वर्षभर कुठलेही सांस्कृतिक उमाळे नाही आले, पण देशाची न्यायव्यवस्था सुधारली तर आपल्याला ते हवं आहे ना? त्यामुळे रस्ता कदाचित खडतर असेल पण तो योग्य असेल तर तोच धरला पाहिजे ना? चुकीचा धरून कसा चालेल?" तो.

हे पटलं. सांस्कृतिक वळणं, आडवळणं यात अडकण्यापेक्षा हा रस्ता सरळ होता.

'विमनस्क'चे आभार मानून आम्ही उठलो आणि निघालो. घरी जाताना अजून एक होर्डिंग दिसलं - 'लोकशाही मूल्यांसाठी झगडणारे' एक 'झुंजार नेते', 'सांस्कृतिक संवर्धना'साठी दहीहंडी आयोजित करत होते.

यावेळेस बोडस काहीच बोलला नाही. मीही विषय काढला नाही!